| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**<br>**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं. ०२२-२९४५१००१**<br>**Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in** | |


**प्रेसनोट ३९-२३** **दिनांक :- ०६/०२/२०२३**

# पोलीस भरतीकरीता आलेल्या महिला उमेदवारांची मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वतीने करण्यात आली राहण्याची व्यवस्था.

राज्यातील सर्व जिल्हा पोलीस दल व आयुक्तालयामध्ये पोलीस शिपाई पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येत असुन मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये देखील पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे. आज पावेतो एकुण ३७,८३८ उमेदवारांची शारिरीक चाचणी पार पाडण्यात आली आहे.

दिनांक १०/०२/२०२३ ते दिनांक १३/०२/२०२३ रोजी पर्यंत महिला उमेदवारांकरीता शारिरीक चाचणी प्रक्रिया नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर (प.) येथे होणार आहे. महिला पोलीसांसाठी एकुण २९७ व चालक म्हणुन ०२ जागेंची भरती होणार आहे. महिला भरती प्रक्रिये दरम्यान महिला उमेदवारांच्या राहण्याची गैरसोय होवू नये म्हणून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने

१) नगरभवन इमारतीमधील हॉल व टेरेस शेड, भाईंदर (प.) (भरती मैदानापासुन अंतर २ कि.मी.)
२) स्व. प्रमोद महाजन सभागृहातील जागा, भाईंदर (प.), (भरती मैदानापासुन अंतर ४.१ कि.मी.)
३) आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहातील जागा, भाईंदर (पु) (भरती मैदानापासुन अंतर ३.४ कि.मी.)
४) स्व. मिनाताई ठाकरे सभागृह इमारतीमधील जागा, मिरारोड (पु.) (भरती मैदानापासुन अंतर ४.५ कि.मी.)

या ठिकाणी महानगरपालिकेच्या सहकार्याने फक्त उमेदवारांकरिता राहण्याची विनामुल्य व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत आलेल्या नातेवाईकांची व्यवस्था त्यांनी स्वतः करावी. तसेच महिला उमेदवारांना भरती मैदानावर पोहचण्याकरिता सुविधा व्हावी या उद्देशाने सवलतीच्या दरात ॲटो रिक्षा सेवा देखील उपलब्ध ठेवण्यात आली आहे.

सदरची भरती पारदर्शकपणे पार पाडण्याकरीता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

-------